| | |
|---|---|
| Event Name: | DIG Aurangabad August 2016 |
| Exam Name : | DIGAurangabadAug16Slot1 |
| Total Questions : | 100 |
| Duration | 90 Min. |
| Total Marks | 100 |

| | | |
|---|---|---|
| 334586 | Ques. 1. | सचिन -- क्रिकेटचा संघ तयार केला (विभक्तिप्रत्यय निवडा) |
| 1317129 | Opt 1. | ने |
| 1317130 | Opt 2. | ला |
| 1317131 | Opt 3. | ऊन |
| 1317132 | Opt 4. | चा |
| Correct Option : 1 | | |
| 334584 | Ques. 2. | पुढीलपैकी अपूर्ण भूतकाळ दर्शविणारे योग्य वाक्य ओळखा. |
| 1317121 | Opt 1. | मी कार्यक्रम पाहिला. |
| 1317122 | Opt 2. | मी कार्यक्रम पाहतो. |
| 1317123 | Opt 3. | मी कार्यक्रम पाहत होतो. |
| 1317124 | Opt 4. | मी कार्यक्रम पाहत असेन. |
| Correct Option : 3 | | |
| 334581 | Ques. 3. | झाडे' या शब्दाचे मूळ रूप लक्षात घेतल्यास त्याचे लिंग कोणते? |
| 1317109 | Opt 1. | पुल्लिंग |
| 1317110 | Opt 2. | स्त्रीलिंग |
| 1317111 | Opt 3. | नपुंसकलिंग |
| 1317112 | Opt 4. | उभयलिंग |
| Correct Option : 3 | | |
| 334585 | Ques. 4. | गाळलेल्या जागी योग्य जोडशब्द निवडा. घडलेला प्रसंग गोपाळरावांनी तिखट_____ लावून सांगितला. |
| 1317125 | Opt 1. | गोड |
| 1317126 | Opt 2. | जाळ |
| 1317127 | Opt 3. | मीठ |
| 1317128 | Opt 4. | खमंग |
| Correct Option : 3 | | |
| 334579 | Ques. 5. | ता स च य म क सू या अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द बनवल्यास त्याचे मधले अक्षर कोणते? |
| 1317101 | Opt 1. | सू |
| 1317102 | Opt 2. | स |
| 1317103 | Opt 3. | ता |
| 1317104 | Opt 4. | च |
| Correct Option : 1 | | |
| 334587 | Ques. 6. | खालीलपैकी कोणत्या वाक्यातील 'पक्ष' या शब्दाचा अर्थ 'पंधरवडा' या अर्थाने आला आहे? |
| 1317133 | Opt 1. | शनिवारवाड्यावर सर्वपक्षीय सभा भरली होती. |
| 1317134 | Opt 2. | श्रीकृष्णाचा जन्म श्रावण वद्य पक्षात झाला. |
| 1317135 | Opt 3. | श्रीकृष्णाने पांडवांचा पक्ष स्वीकारला. |
| 1317136 | Opt 4. | झाडावर पक्ष्यांचा थवा बसला होता |
| Correct Option : 2 | | |
| 334582 | Ques. 7. | वाक्यात आलेले विरामचिन्ह ओळखा - दिवसात तुझी कमाई किती? |
| 1317113 | Opt 1. | उद्गारचिन्ह |
| 1317114 | Opt 2. | पूर्णविराम |
| 1317115 | Opt 3. | अर्धविराम |
| 1317116 | Opt 4. | प्रश्नचिन्ह |
| Correct Option : 4 | | |
| 334580 | Ques. 8. | पल्लवी आस्तिक आहे' या वाक्याचे अर्थ न बदलता केलेले नकारार्थी वाक्य कोणते? |
| 1317105 | Opt 1. | पल्लवी आस्तिक नाही. |

| | | |
|---|---|---|
| 1317106 | Opt 2. | पल्लवीचा देवावर विश्वास आहे |
| 1317107 | Opt 3. | पल्लवी नास्तिक नाही. |
| 1317108 | Opt 4. | पल्लवी नास्तिक आहे. |
| Correct Option : 3 | | |
| 334583 | Ques. 9. | विराज निबंध लिहितो' हे वाक्य कोणत्या काळातील आहे? |
| 1317117 | Opt 1. | साधा भविष्यकाळ |
| 1317118 | Opt 2. | साधा वर्तमानकाळ |
| 1317119 | Opt 3. | पूर्ण भविष्यकाळ |
| 1317120 | Opt 4. | पूर्ण वर्तमानकाळ |
| Correct Option : 2 | | |
| 334590 | Ques. 10. | उद्धट' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता आहे? |
| 1317145 | Opt 1. | रंक |
| 1317146 | Opt 2. | नम्र |
| 1317147 | Opt 3. | कर्मठ |
| 1317148 | Opt 4. | मर्त्य |
| Correct Option : 2 | | |
| 334591 | Ques. 11. | प्रथम पोटाची सोय पाहावी व नंतर देवधर्म करावा' या अर्थाशी संबंधित म्हण ओळखा. |
| 1317149 | Opt 1. | आपलेच दात, आपलेच ओठ |
| 1317150 | Opt 2. | आंधळं दळतं, कुत्रं पीठ खातं |
| 1317151 | Opt 3. | अन्नछत्री जेवणे, वर मिरपूड मागणे |
| 1317152 | Opt 4. | आधी पोटोबा, मग विठोबा |
| Correct Option : 4 | | |
| 334594 | Ques. 12. | दिलेल्या शब्दासाठी योग्य शब्दसमूह निवडा. अप्पलपोटा |
| 1317161 | Opt 1. | दुसऱ्याची चिंता करणारा |
| 1317162 | Opt 2. | मोठे पोट असलेला |
| 1317163 | Opt 3. | स्वतःचाच फायदा पाहणारा |
| 1317164 | Opt 4. | निःस्वार्थ भावनेने वागणारा |
| Correct Option : 3 | | |
| 334592 | Ques. 13. | पुढील अक्षरांत एक म्हण दडली आहे. ती ओळखून त्या म्हणीतील सुरवातीपासून दुसरे व शेवटून दुसरे अक्षर कोणते? गा ब वा पु हो ध ढ ळ गों ढे ली रा च चा वा का ल गी ता ता |
| 1317153 | Opt 1. | चा, ला |
| 1317154 | Opt 2. | ता, गी |
| 1317155 | Opt 3. | ढ, हो |
| 1317156 | Opt 4. | गी, ढे |
| Correct Option : 3 | | |
| 334589 | Ques. 14. | भयंकर तापट या अर्थाचा आलंकारिक शब्द कोणता? |
| 1317141 | Opt 1. | सांबाचा अवतार |
| 1317142 | Opt 2. | विष्णूचा अवतार |
| 1317143 | Opt 3. | नरसिंहाचा अवतार |
| 1317144 | Opt 4. | जमदग्नीचा अवतार |
| Correct Option : 4 | | |
| 334596 | Ques. 15. | हातात कंकण बांधणे' या वाक्प्रचाराचा अर्थ दर्शविणारा पर्याय ओळखा |
| 1317169 | Opt 1. | एकरूप होणे |
| 1317170 | Opt 2. | प्राप्त करून घेणे |
| 1317171 | Opt 3. | प्रतिज्ञा करणे |
| 1317172 | Opt 4. | विश्वासघात करणे |
| Correct Option : 3 | | |
| 334595 | Ques. 16. | पुढीलपैकी कोणत्या वाक्यात 'हात मारणे' हा वाक्प्रचार वापरणे योग्य ठरेल? |
| 1317165 | Opt 1. | त्याने मला जोराने… |

| | | |
|---|---|---|
| 1317166 | Opt 2. | पुरणपोळीवर सर्वांनी……. |
| 1317167 | Opt 3. | मला शाळेत जाताना त्याने…… |
| 1317168 | Opt 4. | लीलाने त्याला……. |
| Correct Option : 2 | | |
| 334588 | Ques. 17. | रिकाम्या जागी कोणता आलंकारिक शब्द वापरता येईल? ठेंगू माणसाला ______ म्हणतात. |
| 1317137 | Opt 1. | वामनमूर्ती |
| 1317138 | Opt 2. | राममूर्ती |
| 1317139 | Opt 3. | कृष्णमूर्ती |
| 1317140 | Opt 4. | त्रिमूर्ती |
| Correct Option : 1 | | |
| 334593 | Ques. 18. | शब्द्समुहाबद्दल एक शब्द निवडा. मोजकाच आहार घेणारा. |
| 1317157 | Opt 1. | मितखाऊ |
| 1317158 | Opt 2. | उपाशी |
| 1317159 | Opt 3. | मिताहारी |
| 1317160 | Opt 4. | भुकेला |
| Correct Option : 3 | | |
| 334599 | Ques. 19. | आयत्या पिठावर रेघोट्या' या म्हणीशी संबंधित अर्थाचा योग्य पर्याय निवडा. |
| 1317181 | Opt 1. | श्रमावाचून मिळालेल्या पैशावर चैन |
| 1317182 | Opt 2. | वाटेल तसे बडबडणे |
| 1317183 | Opt 3. | दुसऱ्यांचे फुकट खाणे |
| 1317184 | Opt 4. | काम पुष्कळ वेळ कमी |
| Correct Option : 1 | | |
| 334601 | Ques. 20. | पुढीलपैकी शुद्ध शब्द ओळखा. |
| 1317189 | Opt 1. | नीयुक्त |
| 1317190 | Opt 2. | नीयूक्त |
| 1317191 | Opt 3. | नियुक्त |
| 1317192 | Opt 4. | नियुत्क |
| Correct Option : 3 | | |
| 334597 | Ques. 21. | मूढ' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा. |
| 1317173 | Opt 1. | शिरोमणी |
| 1317174 | Opt 2. | दिङ्मूढ |
| 1317175 | Opt 3. | शांत |
| 1317176 | Opt 4. | शहाणा |
| Correct Option : 4 | | |
| 334603 | Ques. 22. | वारा' या शब्दाचा समानार्थी शब्द ओळखा. |
| 1317197 | Opt 1. | मारुत |
| 1317198 | Opt 2. | सलील |
| 1317199 | Opt 3. | अनल |
| 1317200 | Opt 4. | कनक |
| Correct Option : 1 | | |
| 334602 | Ques. 23. | कपाळ' या शब्दाचा समानार्थी शब्द पुढीलपैकी कोणता आहे? |
| 1317193 | Opt 1. | वपू |
| 1317194 | Opt 2. | तन |
| 1317195 | Opt 3. | ललाट |
| 1317196 | Opt 4. | देह |
| Correct Option : 3 | | |
| 334600 | Ques. 24. | मी पाणी पितो.' या वाक्यातील 'पितो' या शब्दाचा अर्थ पुढीलपैकी कोणता? |
| 1317185 | Opt 1. | आज्ञार्थ |
| 1317186 | Opt 2. | विध्यर्थ |

| | | |
|---|---|---|
| 1317187 | Opt 3. | स्वार्थ |
| 1317188 | Opt 4. | संकेतार्थ |
| Correct Option : 3 | | |

| | | |
|---|---|---|
| 334598 | Ques. 25. | पुढीलपैकी अशुद्ध शब्द ओळखा. |
| 1317177 | Opt 1. | योगासन |
| 1317178 | Opt 2. | शवासन |
| 1317179 | Opt 3. | मत्स्यासन |
| 1317180 | Opt 4. | शिर्षासन |
| Correct Option : 4 | | |

| | | |
|---|---|---|
| 334609 | Ques. 26. | सूर्यग्रहण कोणत्या तिथीला होऊ शकते? |
| 1317221 | Opt 1. | पौर्णिमेला |
| 1317222 | Opt 2. | चतुर्थीला |
| 1317223 | Opt 3. | अष्टमीला |
| 1317224 | Opt 4. | अमावास्येला |
| Correct Option : 4 | | |

| | | |
|---|---|---|
| 334611 | Ques. 27. | डेसिबल मध्ये खालीलपैकी काय मोजले जाते? |
| 1317229 | Opt 1. | ध्वनी |
| 1317230 | Opt 2. | समुद्राची खोली |
| 1317231 | Opt 3. | प्रकाशाचा वेग |
| 1317232 | Opt 4. | उर्जा |
| Correct Option : 1 | | |

| | | |
|---|---|---|
| 334615 | Ques. 28. | लोकहितवादींचे पूर्ण नाव काय? |
| 1317245 | Opt 1. | गोपाळ हरी देशमुख |
| 1317246 | Opt 2. | गणेश वासुदेव जोशी |
| 1317247 | Opt 3. | जगन्नाथ शंकरशेठ मुरकुटे |
| 1317248 | Opt 4. | दादोबा पांडुरंग तर्खडकर |
| Correct Option : 1 | | |

| | | |
|---|---|---|
| 334623 | Ques. 29. | भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी रेडिओवरील कोणत्या कार्यक्रमामधून नागरिकांशी संवाद साधतात? |
| 1317277 | Opt 1. | जन की बात |
| 1317278 | Opt 2. | मन की बात |
| 1317279 | Opt 3. | सरकार से बात |
| 1317280 | Opt 4. | अब की बार मोदी सरकार |
| Correct Option : 2 | | |

| | | |
|---|---|---|
| 334620 | Ques. 30. | रिओ 2016 ही बहुखेल स्पर्धा कोणत्या देशात घेतली जात आहे? |
| 1317265 | Opt 1. | भारत |
| 1317266 | Opt 2. | चीन |
| 1317267 | Opt 3. | पेरू |
| 1317268 | Opt 4. | ब्राझील |
| Correct Option : 4 | | |

| | | |
|---|---|---|
| 334628 | Ques. 31. | स्वामी विवेकानंदांचे मूळ नाव काय? |
| 1317297 | Opt 1. | नरेंद्रकुमार दत्ता |
| 1317298 | Opt 2. | नरेश ठाकूर |
| 1317299 | Opt 3. | नरेंद्रनाथ दत्त |
| 1317300 | Opt 4. | नरेंद्र ठाकूर |
| Correct Option : 3 | | |

| | | |
|---|---|---|
| 334616 | Ques. 32. | जून २०१५ मध्ये भारतीय लष्कराने कोणत्या देशाच्या सीमेमध्ये घुसून आतंकवाद्यांना मारले? |
| 1317249 | Opt 1. | पाकिस्तान |
| 1317250 | Opt 2. | म्यानमार |
| 1317251 | Opt 3. | नेपाळ |

| | | |
|---|---|---|
| 1317252 | Opt 4. | भूतान |
| Correct Option : 2 | | |
| 334610 | Ques. 33. | प्रसिद्ध जगन्नाथ मंदिर कोणत्या राज्यात आहे? |
| 1317225 | Opt 1. | आंध्र प्रदेश |
| 1317226 | Opt 2. | कर्नाटक |
| 1317227 | Opt 3. | मध्य प्रदेश |
| 1317228 | Opt 4. | ओरिसा |
| Correct Option : 4 | | |
| 334624 | Ques. 34. | तमिळनाडूतील कुडनकुलम ठिकाणी कोणत्या देशाच्या सहकार्याने अणुउर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहे? |
| 1317281 | Opt 1. | रशिया |
| 1317282 | Opt 2. | अमेरिका |
| 1317283 | Opt 3. | पाकिस्तान |
| 1317284 | Opt 4. | चीन |
| Correct Option : 1 | | |
| 334617 | Ques. 35. | वर्ष 2016 मध्ये करण्यात आलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळातील बदलाप्रमाणे भारताचे नवे मानव संसाधन विकास मंत्री कोण आहेत? |
| 1317253 | Opt 1. | स्म्रिती इराणी |
| 1317254 | Opt 2. | रामदास आठवले |
| 1317255 | Opt 3. | अनंत गीते |
| 1317256 | Opt 4. | प्रकाश जावडेकर |
| Correct Option : 4 | | |
| 334606 | Ques. 36. | लोकसभेचा कार्यकाल ______ वर्षांचा असतो. |
| 1317209 | Opt 1. | दोन |
| 1317210 | Opt 2. | तीन |
| 1317211 | Opt 3. | पाच |
| 1317212 | Opt 4. | सहा |
| Correct Option : 3 | | |
| 334604 | Ques. 37. | राष्ट्रपती व मंत्रीमंडळ यांच्यातील दुवा कोण ? |
| 1317201 | Opt 1. | राज्यपाल |
| 1317202 | Opt 2. | उपराष्ट्रपती |
| 1317203 | Opt 3. | पंतप्रधान |
| 1317204 | Opt 4. | न्यायाधीश |
| Correct Option : 3 | | |
| 334627 | Ques. 38. | जॅक्सनचा वध करणारे अनंत कान्हेरे कोणत्या संघटनेशी संबंधित होते? |
| 1317293 | Opt 1. | अभिनव भारत |
| 1317294 | Opt 2. | अनुशीलन |
| 1317295 | Opt 3. | भवानी मंदिर |
| 1317296 | Opt 4. | शिवाजी क्लब |
| Correct Option : 1 | | |
| 334614 | Ques. 39. | स्वामी विवेकानंदानी _______ रोजी शिकागो येथे सर्वधर्म परिषद गाजवून जगाचे लक्ष आकृष्ट करून घेतले? |
| 1317241 | Opt 1. | ११ सप्टेंबर १८९३ |
| 1317242 | Opt 2. | ११ सप्टेंबर १८९४ |
| 1317243 | Opt 3. | १० सप्टेंबर १८९४ |
| 1317244 | Opt 4. | १० सप्टेंबर १८९३ |
| Correct Option : 1 | | |
| 334619 | Ques. 40. | जून 2016 मध्ये इस्त्रोने एकाच वेळी किती उपग्रह अंतराळात सोडले? |
| 1317261 | Opt 1. | 20 |
| 1317262 | Opt 2. | 10 |
| 1317263 | Opt 3. | 16 |

| | | |
|---|---|---|
| 1317264 | Opt 4. | 4 |
| Correct Option : 1 | | |
| 334608 | Ques. 41. | कळसूबाई शिखर कोणत्या पर्वतावर आहे? |
| 1317217 | Opt 1. | सातपुडा |
| 1317218 | Opt 2. | अरवली |
| 1317219 | Opt 3. | सह्याद्री |
| 1317220 | Opt 4. | निलगिरी |
| Correct Option : 3 | | |
| 334618 | Ques. 42. | जून 2016 मध्ये निधन झालेले मुहम्मद अली कोणत्या क्षेत्राशी संबंधित होते? |
| 1317257 | Opt 1. | गायक |
| 1317258 | Opt 2. | मुष्ठीयोद्धा |
| 1317259 | Opt 3. | जलतरणपटू |
| 1317260 | Opt 4. | सायकलपटू |
| Correct Option : 2 | | |
| 334607 | Ques. 43. | कोणत्याही दोन ताऱ्यांतील अंतर ______ या परिमाणाने मोजतात. |
| 1317213 | Opt 1. | किलोमीटर |
| 1317214 | Opt 2. | मैल |
| 1317215 | Opt 3. | प्रकाशवर्ष |
| 1317216 | Opt 4. | प्रकाशमैल |
| Correct Option : 3 | | |
| 334626 | Ques. 44. | जालंधर - अमृतसर मार्गावरील कोणत्या रेल्वे स्थानकास भारतातील सर्वात स्वच्छ रेल्वेस्थानकाचा पुरस्कार प्राप्त झाला? |
| 1317289 | Opt 1. | अंबाला |
| 1317290 | Opt 2. | जालंधर |
| 1317291 | Opt 3. | बियास |
| 1317292 | Opt 4. | अमृतसर |
| Correct Option : 3 | | |
| 334605 | Ques. 45. | _____ चा राजीनामा म्हणजे संपूर्ण मंत्रीमंडळाचा राजीनामा होय. |
| 1317205 | Opt 1. | पंतप्रधान |
| 1317206 | Opt 2. | संसद |
| 1317207 | Opt 3. | राष्ट्रपती |
| 1317208 | Opt 4. | लोकसभा सभापती |
| Correct Option : 1 | | |
| 334621 | Ques. 46. | जुलै 2016 मध्ये पोलंड मधील U -20 वर्ल्ड चम्पियनशिप मध्ये कोणत्या खेळाडूने भालाफेक स्पर्धेमध्ये सुवर्णपदक पटकावले? |
| 1317269 | Opt 1. | राही सरनोबत |
| 1317270 | Opt 2. | नीरज चोप्रा |
| 1317271 | Opt 3. | नरसिंह यादव |
| 1317272 | Opt 4. | इंद्रजीत सिंह |
| Correct Option : 2 | | |
| 334625 | Ques. 47. | लक्षद्वीप या संघराज्य प्रदेशाची राजधानी कोणती? |
| 1317285 | Opt 1. | कवरत्ती |
| 1317286 | Opt 2. | सिल्वासा |
| 1317287 | Opt 3. | पोर्ट ब्लेयर |
| 1317288 | Opt 4. | इम्फाळ |
| Correct Option : 1 | | |
| 334622 | Ques. 48. | जुलै 2016 मध्ये वेस्ट इंडीज विरुद्धच्या टेस्ट क्रिकेट सामन्यात कोणत्या भारतीय खेळाडूने आपले पहिले द्विशतक झळकविले? |
| 1317273 | Opt 1. | आर अश्विन |

| | | |
|---|---|---|
| 1317274 | Opt 2. | एम एस धोनी |
| 1317275 | Opt 3. | विराट कोहली |
| 1317276 | Opt 4. | सुरेश रैना |
| Correct Option : 3 | | |
| 334612 | Ques. 49. | दादरा नगरहवेली या संघराज्य प्रदेशाची राजधानी ______ ही आहे. |
| 1317233 | Opt 1. | कवरत्ती |
| 1317234 | Opt 2. | सिल्व्हासा |
| 1317235 | Opt 3. | गंगटोक |
| 1317236 | Opt 4. | शिलाँग |
| Correct Option : 2 | | |
| 334613 | Ques. 50. | हाजिया सोफिया ही वास्तू कोणत्या शहरात आहे? |
| 1317237 | Opt 1. | रोम |
| 1317238 | Opt 2. | रमल्ला |
| 1317239 | Opt 3. | इस्तंबूल |
| 1317240 | Opt 4. | कैरो |
| Correct Option : 3 | | |
| 334629 | Ques. 51. | अशी लहानात लहान संख्या कोणती, जिला १२ ने भागले असता बाकी ७ उरते, १६ ने भागले असता बाकी ९ उरते आणि १८ ने भागले असता बाकी ११ उरते? |
| 1317301 | Opt 1. | 149 |
| 1317302 | Opt 2. | 135 |
| 1317303 | Opt 3. | 137 |
| 1317304 | Opt 4. | 133 |
| Correct Option : 3 | | |
| 334632 | Ques. 52. | नंदूने ६०००० रुपये कर्जाऊ रक्कम घेतल्यानंतर ३ वर्षांनी मुद्दल व व्याज मिळून ८१६०० रुपये परत केले. या व्यवहारात त्याला द. सा.द. शे. किती टक्के व्याज द्यावे लागले? |
| 1317313 | Opt 1. | 10 |
| 1317314 | Opt 2. | 14 |
| 1317315 | Opt 3. | 12 |
| 1317316 | Opt 4. | 15 |
| Correct Option : 3 | | |
| 334633 | Ques. 53. | x = २ आणि y = - ५ या किमती असताना खालीलपैकी कोणत्या राशीची किंमत १६ असेल? |
| 1317317 | Opt 1. | 2x + 3y |
| 1317318 | Opt 2. | 2x - 3y |
| 1317319 | Opt 3. | 3x - 2y |
| 1317320 | Opt 4. | 3x + 2y |
| Correct Option : 3 | | |
| 334630 | Ques. 54. | ताशी ४५ किमी वेगाने जाणारी एक मोटारसायकल एक पूल २० सेकंदात पार करते तर त्या पुलाची लांबी किती? |
| 1317305 | Opt 1. | ९०० मीटर |
| 1317306 | Opt 2. | ३५० मीटर |
| 1317307 | Opt 3. | २५० मीटर |
| 1317308 | Opt 4. | २२५ मीटर |
| Correct Option : 3 | | |
| 334635 | Ques. 55. | वामनरावांनी २२५० रुपयांचे कर्ज ५ हप्त्यांत फेडले. प्रत्येक हप्ता मागील हप्त्यापेक्षा ५० रु. अधिक होता, तर पहिला हप्ता किती रुपयांचा होता? |
| 1317325 | Opt 1. | 350 |
| 1317326 | Opt 2. | 400 |
| 1317327 | Opt 3. | 500 |
| 1317328 | Opt 4. | 550 |
| Correct Option : 1 | | |

| | | |
|---|---|---|
| 334634 | Ques. 56. | p या संख्येला ९ ने गुणले असता येणारा गुणाकार हा p च्या गुणाकार व्यस्ता एवढा येतो, तर p ची किंमत कोणती? |
| 1317321 | Opt 1. | १ |
| 1317322 | Opt 2. | ९ |
| 1317323 | Opt 3. | (१/९) |
| 1317324 | Opt 4. | (१/३) |
| Correct Option : 4 | | |
| 334631 | Ques. 57. | द.सा.द.शे. किती टक्के दराने १५०० रु. ची ३ वर्षात १८६० रु. रास होईल? |
| 1317309 | Opt 1. | 8 |
| 1317310 | Opt 2. | 12 |
| 1317311 | Opt 3. | 10 |
| 1317312 | Opt 4. | 6 |
| Correct Option : 1 | | |
| 334638 | Ques. 58. | एका क्रिकेट सामन्यात पहिल्या चार खेळाडूंच्या धावांची सरासरी ६६ असून उरलेल्या ७ खेळाडूंच्या धावांची सरासरी २२ आहे, तर संपूर्ण संघाची धावांची सरासरी किती? |
| 1317337 | Opt 1. | 44 |
| 1317338 | Opt 2. | 41 |
| 1317339 | Opt 3. | 39 |
| 1317340 | Opt 4. | 38 |
| Correct Option : 4 | | |
| 334641 | Ques. 59. | ७.५ रु. डझन या भावाने १६ डझन पेन्सिली विकत घेतल्या. शेकडा २० नफा मिळविण्यासाठी प्रत्येक पेन्सिल केवढ्याला विकावी? |
| 1317349 | Opt 1. | ७५ पैसे |
| 1317350 | Opt 2. | ८० पैसे |
| 1317351 | Opt 3. | ९० पैसे |
| 1317352 | Opt 4. | १ रु |
| Correct Option : 1 | | |
| 334640 | Ques. 60. | ५० मी लांब व ३० मी रुंद अशा आयताकृती बागेच्या चारही बाजूंवर २ मी अंतरावर एक खांब लावला, तर किती खांब लागतील? |
| 1317345 | Opt 1. | 91 |
| 1317346 | Opt 2. | 89 |
| 1317347 | Opt 3. | 80 |
| 1317348 | Opt 4. | 88 |
| Correct Option : 3 | | |
| 334639 | Ques. 61. | २० कामगार रोज ६ तास काम करून ३५ वस्तू तयार करतात. तेवढ्याच वस्तू तयार करण्यासाठी १५ कामगारांना रोज किती तास जास्त काम करावे लागेल? |
| 1317341 | Opt 1. | ८ तास |
| 1317342 | Opt 2. | ६ तास |
| 1317343 | Opt 3. | २ तास |
| 1317344 | Opt 4. | १ तास |
| Correct Option : 3 | | |
| 334636 | Ques. 62. | एका रांगेत जेवढे विद्यार्थी तेवढ्याच रांगा आहेत. निलेश मधल्या रांगेत मध्यभागी उभा असून त्याचा क्रमांक ११ वा आहे. तर कवायतीस किती मुले होती? |
| 1317329 | Opt 1. | 441 |
| 1317330 | Opt 2. | 221 |
| 1317331 | Opt 3. | 364 |
| 1317332 | Opt 4. | 400 |
| Correct Option : 1 | | |
| 334637 | Ques. 63. | जॉन व महम्मद यांच्या वयांची बेरीज २५ वर्षे आहे. महम्मद आणि गोविंद यांच्या वयांची बेरीज ३५ वर्षे आणि जॉन व गोविंद यांच्या वयांची बेरीज ३० वर्षे आहे. तर जॉन आणि गोविंद यांच्या वयांचे गुणोत्तर काय असेल? |

| | | |
|---|---|---|
| 1317333 | Opt 1. | २ : १ |
| 1317334 | Opt 2. | १ : २ |
| 1317335 | Opt 3. | २ : ३ |
| 1317336 | Opt 4. | ३ : २ |
| Correct Option : 2 | | |
| 334642 | Ques. 64. | पुढीलपैकी पूर्ण वर्गसंख्या कोणती? |
| 1317353 | Opt 1. | 4624 |
| 1317354 | Opt 2. | 3147 |
| 1317355 | Opt 3. | 6745 |
| 1317356 | Opt 4. | 8428 |
| Correct Option : 1 | | |
| 334646 | Ques. 65. | मेघा A या ठिकाणाहून निघून सरळ पूर्वेकडे काही अंतरावर असणाऱ्या B या ठिकाणी गेली. तिथून काटकोनात वळून उत्तरेकडे ६० मी अंतरावर असलेल्या C या ठिकाणी गेली. नंतर सरळ पूर्वेकडे २० मी अंतरावर असलेल्या D या ठिकाणी गेली. A ते D हे सरळ अंतर १०० मी आहे. तर A पासून B पर्यंतचे अंतर किती मीटर असेल? |
| 1317369 | Opt 1. | 80 |
| 1317370 | Opt 2. | 800 |
| 1317371 | Opt 3. | 60 |
| 1317372 | Opt 4. | 400 |
| Correct Option : 3 | | |
| 334644 | Ques. 66. | गहू व तांदूळ यांच्या पोत्यांचे सरासरी वजन ६० किग्रॅ आहे. तांदूळ व ज्वारी यांच्या पोत्यांचे सरासरी वजन ८० किग्रॅ आहे. गहू व ज्वारी यांच्या पोत्यांचे एकूण वजन १४० किग्रॅ आहे. तर गहू, ज्वारी व तांदूळ यांच्या पोत्यांचे सरासरी वजन किती? |
| 1317361 | Opt 1. | ६० किग्रॅ |
| 1317362 | Opt 2. | ७० किग्रॅ |
| 1317363 | Opt 3. | ८० किग्रॅ |
| 1317364 | Opt 4. | ९० किग्रॅ |
| Correct Option : 2 | | |
| 334648 | Ques. 67. | एका जमिनीवर ८ मी लांब, ५ मी रुंद व १.५ मी खोल खड्डा खणून, त्यातील माती २५ मी लांब व १६ मी रुंद अशा आयताकार भूखंडावर पसरली; तर त्या मातीचा किती सेमी जाडीचा थर तयार होईल? |
| 1317377 | Opt 1. | 0.15 |
| 1317378 | Opt 2. | 15 |
| 1317379 | Opt 3. | 0.015 |
| 1317380 | Opt 4. | 1.5 |
| Correct Option : 2 | | |
| 334650 | Ques. 68. | जर एका संख्येचे 10% दुसऱ्या संख्येच्या 3/5 असेल तर पहिल्या संख्येचे दुसऱ्या संख्येशी गुणोत्तर किती? |
| 1317385 | Opt 1. | 4 |
| 1317386 | Opt 2. | 5 |
| 1317387 | Opt 3. | 6 |
| 1317388 | Opt 4. | 7 |
| Correct Option : 3 | | |
| 334652 | Ques. 69. | अ एक काम १८ दिवसात करू शकतो ब हा अ पेक्षा २०% अधिक प्रभावी पणे काम करतो. तर ब हे काम किती दिवसात पूर्ण करेल? |
| 1317393 | Opt 1. | ९ दिवस |
| 1317394 | Opt 2. | १२ दिवस |
| 1317395 | Opt 3. | १५ दिवस |
| 1317396 | Opt 4. | १८ दिवस |
| Correct Option : 3 | | |
| 334647 | Ques. 70. | रोहितजवळ ५० पैशांची १७८ नाणी आहेत. त्यातील काही नाण्यांचे त्याने २ रुपयांच्या १७ नाण्यांत, काही नाण्यांचे ५ रुपयांच्या २१ नाण्यांत व उरलेल्या नाण्यांचे १० रुपयांच्या नोटांत रुपांतर करून घेतले असल्यास आता त्याच्याकडील नाणी व नोटा यांची एकूण संख्या किती झाली असेल? |

| | | |
|---|---|---|
| 1317373 | Opt 1. | 38 |
| 1317374 | Opt 2. | 73 |
| 1317375 | Opt 3. | 35 |
| 1317376 | Opt 4. | 53 |
| Correct Option : 2 | | |
| 334651 | Ques. 71. | दसादशे 5 दराने एका रकमेवरचे चक्रवाढ व्याज दोन वर्षात 3075 रु होते. जर व्याजदर निम्मा केला व मुदत दुप्पट केली असता ह्या रकमेवर सरळव्याज किती होईल? |
| 1317389 | Opt 1. | 3000 रु |
| 1317390 | Opt 2. | 3100 रु |
| 1317391 | Opt 3. | 3200 रु |
| 1317392 | Opt 4. | 3300 रु |
| Correct Option : 1 | | |
| 334653 | Ques. 72. | एका डब्यात १४४ ग्रॅम वजनाचे प्रत्येकी ५ चेंडू आहेत व ९६ ग्रॅम वजनाचे प्रत्येकी २५ चेंडू आहेत. तर सर्व चेंडूचे मिळून सरासरी वजन किती ? |
| 1317397 | Opt 1. | ९६ |
| 1317398 | Opt 2. | १०४ |
| 1317399 | Opt 3. | १२४ |
| 1317400 | Opt 4. | १४४ |
| Correct Option : 2 | | |
| 334645 | Ques. 73. | पाच क्रमवार सम संख्यांची सरासरी १२ आहे, तर सर्वात लहान सम संख्या सर्वात मोठ्या सम संख्येच्या किती पट आहे? |
| 1317365 | Opt 1. | दुप्पट |
| 1317366 | Opt 2. | निमपट |
| 1317367 | Opt 3. | चौपट |
| 1317368 | Opt 4. | पावपट |
| Correct Option : 2 | | |
| 334643 | Ques. 74. | हरबाकडे जेवढ्या घोंगड्या आहेत त्याच्या दुप्पट रुपये किंमत प्रत्येक घोंगडीची आहे. त्याच्याकडे एकूण ४६०८ रु. च्या घोंगड्या असल्यास त्याच्याजवळ घोंगड्या किती? |
| 1317357 | Opt 1. | 52 |
| 1317358 | Opt 2. | 48 |
| 1317359 | Opt 3. | 58 |
| 1317360 | Opt 4. | 96 |
| Correct Option : 2 | | |
| 334649 | Ques. 75. | छापील किमतीवर ३० टक्के सूट देऊनही ५ टक्के नफा होत असल्यास, ३०० रु. छापील किंमत असलेल्या वस्तूची खरेदीची किंमत किती? |
| 1317381 | Opt 1. | २०० रु. |
| 1317382 | Opt 2. | २१० रु. |
| 1317383 | Opt 3. | १९५ रु. |
| 1317384 | Opt 4. | १६८ रु. |
| Correct Option : 1 | | |
| 334659 | Ques. 76. | 123, 246, 369, 492, ? |
| 1317421 | Opt 1. | 628 |
| 1317422 | Opt 2. | 515 |
| 1317423 | Opt 3. | 518 |
| 1317424 | Opt 4. | 615 |
| Correct Option : 4 | | |
| 334655 | Ques. 77. | गटात न बसणारा घटक ओळखा. |
| 1317405 | Opt 1. | जस्त |
| 1317406 | Opt 2. | पारा |
| 1317407 | Opt 3. | लोखंड |

| | | |
|---|---|---|
| 1317408 | Opt 4. | तांबे |
| Correct Option : 2 | | |
| 334660 | Ques. 78. | पुढील मालिकेतील चुकीचे पद ओळखा. A, C, F, J, O, V |
| 1317425 | Opt 1. | A |
| 1317426 | Opt 2. | F |
| 1317427 | Opt 3. | J |
| 1317428 | Opt 4. | V |
| Correct Option : 4 | | |
| 334654 | Ques. 79. | AY, BX, CW, DV, _____ ? |
| 1317401 | Opt 1. | EV |
| 1317402 | Opt 2. | EU |
| 1317403 | Opt 3. | VE |
| 1317404 | Opt 4. | EW |
| Correct Option : 2 | | |
| 334657 | Ques. 80. | पुढील प्रश्नात पहिल्या व दुसऱ्या पदाचा जसा संबंध आहे, अगदी तसाच संबंध तिसऱ्या व प्रश्नचिन्हाच्या जागी येणाऱ्या पदाचा आहे. प्रश्नचिन्हाच्या जागी येणारे पद पर्यायातून निवडा. गोदावरी : सह्याद्री : : तापी : ? |
| 1317413 | Opt 1. | ब्रम्हगिरी |
| 1317414 | Opt 2. | अरवली |
| 1317415 | Opt 3. | सातपुडा |
| 1317416 | Opt 4. | विंध्याद्री |
| Correct Option : 3 | | |
| 334658 | Ques. 81. | पुढील प्रश्नात पहिल्या व दुसऱ्या पदाचा जसा संबंध आहे, अगदी तसाच संबंध तिसऱ्या व प्रश्नचिन्हाच्या जागी येणाऱ्या पदाचा आहे. प्रश्नचिन्हाच्या जागी येणारे पद पर्यायातून निवडा. 5 : 130 : : ? : 68 |
| 1317417 | Opt 1. | 64 |
| 1317418 | Opt 2. | 68 |
| 1317419 | Opt 3. | 4 |
| 1317420 | Opt 4. | 16 |
| Correct Option : 3 | | |
| 334663 | Ques. 82. | एका सांकेतिक भाषेत 'सधन' हा शब्द 428 असा आणि 'वानवा' हा शब्द 585 असा लिहितात, तर या भाषेत ' धनवान' हा शब्द कसा लिहावा? |
| 1317437 | Opt 1. | 5288 |
| 1317438 | Opt 2. | 2858 |
| 1317439 | Opt 3. | 2585 |
| 1317440 | Opt 4. | 5252 |
| Correct Option : 2 | | |
| 334664 | Ques. 83. | पाण्याला निळे म्हटले, निळ्याला काळे म्हटले, काळ्याला लाल म्हटले, लालला पिवळे म्हटले, पिवळ्याला हिरवे म्हटले, हिरव्याला पांढरे म्हटले, पांढऱ्याला जांभळे म्हटले तर दूधाचा रंग कोणता? |
| 1317441 | Opt 1. | हिरवा |
| 1317442 | Opt 2. | पांढरा |
| 1317443 | Opt 3. | पिवळा |
| 1317444 | Opt 4. | जांभळा |
| Correct Option : 4 | | |
| 334661 | Ques. 84. | पुढील मालिकेतील चुकीचे पद ओळखा. 2, 6, 12, 20, 32, 42, 56 |
| 1317429 | Opt 1. | 12 |
| 1317430 | Opt 2. | 20 |
| 1317431 | Opt 3. | 32 |
| 1317432 | Opt 4. | 42 |
| Correct Option : 3 | | |
| 334656 | Ques. 85. | गटात न बसणारा घटक ओळखा. |

| | | |
|---|---|---|
| 1317409 | Opt 1. | साप |
| 1317410 | Opt 2. | पाल |
| 1317411 | Opt 3. | व्हेल |
| 1317412 | Opt 4. | मगर |
| Correct Option : 3 | | |
| 334665 | Ques. 86. | पुढील मालिकेत सलग दोन A नंतर B किती वेळा आला आहे? A A B A A H A A B C F Q D A B H K M R S S B B A B P T S Q H R A A B T L J I C E E A A B B A A B B X Y T A B |
| 1317445 | Opt 1. | 5 |
| 1317446 | Opt 2. | 4 |
| 1317447 | Opt 3. | 3 |
| 1317448 | Opt 4. | 2 |
| Correct Option : 1 | | |
| 334662 | Ques. 87. | जर 583 ही संख्या सांकेतिक भाषेत 462 अशी लिहिली जाते, तर 792 ही संख्या सांकेतिक भाषेत कशी लिहिली जाईल? |
| 1317433 | Opt 1. | 693 |
| 1317434 | Opt 2. | 572 |
| 1317435 | Opt 3. | 671 |
| 1317436 | Opt 4. | 385 |
| Correct Option : 3 | | |
| 334674 | Ques. 88. | सचिनचे घड्याळ प्रत्येक तासाला 4 सेकंद पुढे जाते. सोमवारी सकाळी 11 : 00 वाजता बरोबर लावलेले घड्याळ त्यानंतर येणाऱ्या शनिवारी सकाळी 11 : 00 वाजता कोणती वेळ दाखवेल? |
| 1317481 | Opt 1. | 11 : 08 |
| 1317482 | Opt 2. | 11 : 02 |
| 1317483 | Opt 3. | 11 : 30 |
| 1317484 | Opt 4. | 11 : 48 |
| Correct Option : 1 | | |
| 334673 | Ques. 89. | जर PQRSTUVW हे आठ लोक एका गोल टेबलाभोवती घड्याळाच्याकाट्याच्या दिशेत समान अंतरावर चर्चा करीत बसले असतील व V हा उत्तरेला बसला असेल तर S कोणत्या स्थानावर असेल? |
| 1317477 | Opt 1. | पश्चिम |
| 1317478 | Opt 2. | नैऋत्य |
| 1317479 | Opt 3. | दक्षिण |
| 1317480 | Opt 4. | वायव्य |
| Correct Option : 2 | | |
| 334668 | Ques. 90. | एका सांकेतिक भाषेत 573 चा अर्थ bring cold water, असा होतो. 342 चा अर्थ water is good असा होतो व bright good boy यासाठी 126 असा संकेत वापरतात तर boy is bright साठी खालीलपैकी कोणते संकेत येतील? |
| 1317457 | Opt 1. | 671 |
| 1317458 | Opt 2. | 574 |
| 1317459 | Opt 3. | 641 |
| 1317460 | Opt 4. | 673 |
| Correct Option : 3 | | |
| 334667 | Ques. 91. | एका सांकेतिक भाषेत MAKE हा शब्द FLBN असा लिहिला तर त्याच सांकेतिक भाषेत SURE हा शब्द कसा लिहिला जाईल? |
| 1317453 | Opt 1. | FSVT |
| 1317454 | Opt 2. | GSLN |
| 1317455 | Opt 3. | TPXN |
| 1317456 | Opt 4. | FSTV |
| Correct Option : 1 | | |
| 334670 | Ques. 92. | 13 : 196 :: 16 : ? |
| 1317465 | Opt 1. | 289 |
| 1317466 | Opt 2. | 144 |

| | | |
|---|---|---|
| 1317467 | Opt 3. | 121 |
| 1317468 | Opt 4. | 324 |
| Correct Option : 1 | | |
| 334672 | Ques. 93. | सुनील उत्तरेकडे तोंड करून उभा आहे, उत्तरेस तो सरळ 9 Km चालत गेला, उजवीकडे वळून तेथून त्याने 4 Km अंतर कापले. पुन्हा तेथून उजवीकडे वळून त्याने 15 Km अंतर कापले. पुन्हा एकदा उजवीकडे वळून 12 Km अंतर कापले. तर आता तो आपल्या मूळ स्थानापासून किती अंतरावर आहे? |
| 1317473 | Opt 1. | 6 Km |
| 1317474 | Opt 2. | 8 Km |
| 1317475 | Opt 3. | 10 Km |
| 1317476 | Opt 4. | 17 Km |
| Correct Option : 3 | | |
| 334671 | Ques. 94. | पुढील प्रश्नामध्ये दोन विधाने व दोन अनुमाने दिलेली आहेत. दिलेली विधाने सत्य आहेत असे समजा. त्यावरून दिलेल्या अनुमानांपैकी कोणते अनुमान/ अनुमाने निघू शकतात ते ठरवा व योग्य पर्याय निवडा. विधान : काही गाद्या सुटकेस आहेत. कोणतेही सुटकेस कपाट नाही. अनुमान : 1) काही कपाट सुटकेस असतीलच 2) कोणतीही गादी सुटकेस नसणारच |
| 1317469 | Opt 1. | फक्त अनुमान 1 बरोबर |
| 1317470 | Opt 2. | फक्त अनुमान 2 बरोबर |
| 1317471 | Opt 3. | अनुमान 1 व 2 दोन्ही बरोबर |
| 1317472 | Opt 4. | अनुमान 1 व 2 दोन्ही चूक |
| Correct Option : 4 | | |
| 334669 | Ques. 95. | एक दुकानदार आपल्या दुकानातील वस्तूंच्या किंमती सांकेतिक स्वरुपात व्यक्त करण्यासाठी MAKESTRONG या अक्षरांचा वापर करतो. या नुसार M = 0, A = 1, K = 2, E = 3 व याप्रमाणे पुढे क्रमांक आहेत. तर ON व SM असे लेबल असणाऱ्या प्रत्येकी एक वस्तू ग्राहकाने घेतल्यास दुकानदार एकूण किती रकमेची मागणी करेल? |
| 1317461 | Opt 1. | 118 |
| 1317462 | Opt 2. | 7840 |
| 1317463 | Opt 3. | 784 |
| 1317464 | Opt 4. | 1180 |
| Correct Option : 1 | | |
| 334666 | Ques. 96. | एका सांकेतिक भाषेत इंग्रजी शब्द अंकांनी दाखवले जातात. अक्षरे व अंक यांचा क्रम सारखा असेलच असे नाही. PEN = 451, EAT =132 , NOT = 356. पर्यायातील कोणत्या अंकांच्या गटामुळे अर्थपूर्ण शब्द तयार होणार नाही ते शोधा. |
| 1317449 | Opt 1. | 5123 |
| 1317450 | Opt 2. | 4165 |
| 1317451 | Opt 3. | 3153 |
| 1317452 | Opt 4. | 3453 |
| Correct Option : 4 | | |
| 334675 | Ques. 97. | 1 जानेवारी 2002 रोजी मंगळवार असेल तर 1 जानेवारी 2008 रोजी कोणता वार असेल? |
| 1317485 | Opt 1. | सोमवार |
| 1317486 | Opt 2. | मंगळवार |
| 1317487 | Opt 3. | बुधवार |
| 1317488 | Opt 4. | गुरुवार |
| Correct Option : 2 | | |
| 334677 | Ques. 98. | एका अष्टकोनाच्या शिरोबिंदुवर आठजण केंद्राकडे तोंड करून बसले आहेत. विजयच्या समोर रमेश बसला आहे, जो श्रुतीच्या उजव्या बाजूला नाही. श्रुतीच्या समोर श्रेया आहे जी विजयच्या उजव्या बाजूला बसली आहे. विजय व अनिता यांच्यामध्ये दिपक आहे व अनिता, अस्मिताच्या विरुद्ध बाजूस आहे. उर्वरित एका जागेवर गीता आहे, तर गीताच्या समोर (विरुद्ध बाजूस) कोण आहे? |
| 1317493 | Opt 1. | विजय |
| 1317494 | Opt 2. | अनिता |
| 1317495 | Opt 3. | दिपक |

| | | |
|---|---|---|
| 1317496 | Opt 4. | श्रेया |
| Correct Option : 3 | | |
| 334678 | Ques. 99. | एका शेतात काही गायी व काही गुराखी आहेत. गायी आणि गुराखी यांच्या पायांची एकूण संख्या 98 आहे व डोक्यांची संख्या 26 आहे तर त्या ठिकाणी गायी व गुराखी किती आहेत? |
| 1317497 | Opt 1. | 24, 2 |
| 1317498 | Opt 2. | 20, 6 |
| 1317499 | Opt 3. | 23, 3 |
| 1317500 | Opt 4. | 27, 1 |
| Correct Option : 3 | | |
| 334676 | Ques. 100. | 1993 या वर्षीचा स्वातंत्र्यदिन सोमवारी आहे तर त्या वर्षीची गांधीजयंती केव्हा येईल? |
| 1317489 | Opt 1. | बुधवार |
| 1317490 | Opt 2. | मंगळवार |
| 1317491 | Opt 3. | रविवार |
| 1317492 | Opt 4. | सोमवार |
| Correct Option : 3 | | |